



दैनिक महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

VADAL VARTA




vadalvartanews@gmail.com

●मुख्य संपादक : अजय भांगे ●संपादक : रमेश गुळभिले ●कार्यकारी संपादक : संतोष निकम मो.न. ९४२२६६००७७

● बीड/महाराष्ट्र ● रवीवार १० मार्च २०२४ ● आरएनआय/टिसी/एमएएचएमएआर/२०२३/५२३१५ ● वर्ष १ ले ● अंक २०७ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

# देशाला मिळणार दहा नवीन वंदे भारत

## महाराष्ट्रातून धावणार हायस्पीड वंदे भारत ट्रेन

### १० वंदे भारत स्लीपर ट्रेनचा सेट तयार करण्याचे काम सुरु आहे.




देशभरातील धार्मिक स्थळांवर वंदे भारत एक्स्प्रेस सुरु केली जात आहे. अयोध्या रेल्वे स्थानकावर देशातून अनेक ठिकाणांवरुन वंदे भारत एक्स्प्रेस येत आहेत. महाराष्ट्रात शिर्डीसाठी वंदे भारत एक्स्प्रेस सुरु आहेत. आता पुणे ते शेगाव आणि मुंबई ते शेगाव या दोन वंदे भारत सुरु करण्याचा हालचाली सुरु आहेत.

देशात सर्वाधिक लोकप्रिय ठरलेली वंदे भारत सेमी हायस्पीड ट्रेन महाराष्ट्रातून सुरु आहेत. मुंबई- गांधीनगर दरम्यान पहिली वंदे भारत एक्स्प्रेस सुरु झाली होती. त्यानंतर राज्यातील मुंबई-पुणे-सोलापूर, मुंबईवरुन शिर्डी, मुंबई-गोवा, मुंबई-जालना, नागपूर ते बिलासपूर या मार्गांवर वंदे भारत एक्स्प्रेस सुरु आहे. आता देशात आणखी दहा वंदे भारत एक्स्प्रेस सुरु होत आहे. त्यातील दोन एक्स्प्रेस महाराष्ट्रातून सुरु होणार आहे. येत्या १२ मार्च रोजी राज्याला या दोन गाड्या मिळणार आहे. आणखी दोन गाड्या मिळण्याची शक्यता

#### स्लिपर वंदे भारत येणार

अमृत भारत आणि वंदे भारत ट्रेनच्या चेअर कारच्या यशानंतर आता लवकरच लोकांना वंदे भारत ट्रेनचे स्लीपर व्हर्जन देखील रुळांवर पाहायला मिळणार आहे. रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी शनिवारी वंदे भारत स्लीपर ट्रान्झिटच्या कार बॉडी स्ट्रक्चरचे उद्घाटन केले. बेंगळुरूमध्ये ऑक्टोबर 2023 पासून वंदे भारत एक्सप्रेस स्लीपर प्रोटोटाइपतयार होत आहे. वंदे भारत स्लीपर ट्रेनमध्ये राजधानी एक्स्प्रेस गाड्यांपेक्षा चांगल्या सुविधा असणार आहे. एकूण 10 वंदे भारत स्लीपर ट्रेनचा सेट तयार करण्याचे काम सुरु आहे.

#### महाराष्ट्रातून पुणे शहरास मिळाल्या दोन गाड्या

पुणे शहरातून 2 नवीन वंदे भारत रेल्वे सुरू होत आहे. नव्या रेल्वे गाड्यांच्या देखभाल दुरुस्तीचे काम पूर्ण झाले आहे. पुणे-बडोदा आणि पुणे – सिकंदराबाद या नव्या 2 वंदे भारत एक्स्प्रेस सुरू केल्या जाणार आहेत. येत्या 12 मार्च रोजी पुण्यासह देशाला नव्या 10 वंदे भारत रेल्वे एक्स्प्रेस मिळणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे या गाड्यांना हिरवा झेंडा दाखवणार आहेत.

## आज किट्टी आडगाव येथे मनोज जरांगे पाटील साधनार मराठ्यांसोबत संवाद



माजलगाव (प्रतिनिधी ) महाराष्ट्र शासनाने मराठा आरक्षणात महाराष्ट्रातील तमाम मराठ्यांची निराशा केली आहे आणि फसवणूक करून वेळ मारून नेली आहे आंदोलकांवरही पोलिसां मार्फत दबाव तंत्र वापरून आंदोलन मोडीत काढण्याचे प्रयत्न चालवले आहेत तर लोकशाहीचा चिंधड्या केल्या जात आहेत यासाठी आता सरकारशी बोलायचं नाही तर जनतेची चर्चा करायची म्हणून जरांगे पाटलांनी महाराष्ट्रभरासाठी संवाद दौरा चालू केला आहे त्याचाच भाग म्हणून उद्या माजलगाव तालुक्यातील किट्टी आडगाव येथे दुपारी 4:00वाजता मनोज जरांगे पाटील येणार असून तमाम मराठा बांधवांशी ते संवाद साधणार आहेत तरी तालुक्यातील सकल मराठा समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे आसे आवाहन ज्येष्ठ नेते राधाकृष्ण अण्णा होके पाटील, बाबुरावजी पोटभरे यांनी केले असून सभेसाठी पूर्व परवानगी मिळवण्यासाठी राधाकृष्ण अण्णा होके पाटील बाबुरावजी पोटभरे, शंतनू सोळंके, श्रीहरी मोरे, शहाजी सोळंके, अभय होके, माऊली आगे, माऊली पवार, हनुमान आगे, वीरेंद्र आगे सचिन पवार यांनी माजलगाव ग्रामीण पोलिसांची भेट घेतली व पोलिसांनी देखील नियमाच्या अधीन राहून संवाद सभा व्हावी अशी अपेक्षा ठेऊन परवानगी दिली असल्याचे कळाले

मनोज जरांगे पाटील यांच्या किट्टी आडगाव येथील संवाद यात्रेचे भव्य सभेत रूपांतर व्हावे म्हणून राधाकृष्ण होके पाटील मराठा समाजाचे हितचिंतक श्री बाबुरावजी पोटभरे यांच्यासह अनेक मान्यवर परिश्रम घेत आहेत संवाद यात्रेची विराट महासभा व्हावी यासाठी सकल मराठा समाजाने मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन किट्टी आडगाव व पंचक्रोशीतील सकल मराठा समाज यांनी केले आहे.

## कुडूत्रीत महाशिवरात्र उत्साहात संपन्न...

**दैनिक वादळ वार्ता**
**कुडूत्री/सुभाष चौगुले**

सालाबादप्रमाणे कुडूत्री (ता. राधानगरी) येथील श्री.कल्लेश्वर देवालयात महाशिवरात्र उत्सव उत्साहात संपन्न झाला .गेले दोन दिं ८ आणि ९ रोजी दोन दिवस पूजाअर्चा,अभिषेक,भजन ,किर्तन अशा कार्यक्रमांनी उत्सवाची रंगत वाढवली तर महाप्रसादाचा कार्यक्रम देखील संपन्न झाला.

दरवर्षी तालुक्यात महाशिवरात्रीचे सर्वत्र नेटनेटके आयोजन केले जाते. सर्वत्र हा उत्सव मोठया प्रमाणात साजरा केला जातो. कुडूत्री ग्रामस्थांच्या वतीने देखील हा महाशिवरात्र उत्सव साजरा केला जातो. गावातील ग्रामस्थ,वारकरी मंडळी,यांचेकडून भजन ,कीर्तन प्रवचन असे कार्यक्रम आयोजित केले जातात. व दोन दिवस जागरण कार्यक्रम देखील होतो.

हा उत्सव यशस्वी करण्यासाठी गावातील ग्रामस्थ,मंदिराचे पुजारी,वारकरी मंडळी,तरुण युवक,गावातील आचारी मंडळी, सर्व महिला यांनी एकत्र योगदान दिले, व हा उत्सव संपन्न केला.



## जि.प.प्र. केंद्र शाळा कव्हे येथील शिक्षक श्री रणजीत सुरवसे यांना आदर्श शिक्षक पुरस्कार...

**दैनिक वादळ वार्ता**
**सोलापूर/विश्वास चोपडे**

दिनांक ९ मार्च २०२४ रोजी शिक्षण विभाग पंचायत समिती कुर्डूवाडी येथे आदर्श शिक्षक पुरस्कारांचे आयोजन करण्यात आले होते.

जि प शाळा कव्हे येथील शिक्षक श्री. रणजीत देविदास शेळके यांना त्यांच्या शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल करमाळा तालुक्याचे आमदार माननीय संजय (मामा)शिंदे यांच्या शुभहस्ते माढा तालुका स्तरीय आदर्श शिक्षक म्हणून ट्रॉफी व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

कार्यक्रमासाठी रंजीत भैय्या शिंदे चेअरमन सोलापूर जिल्हा दूध संघ, तात्या तरंगे पंचायत समिती कुर्डूवाडी (सदस्य), दिलीप भोसले मार्केट यार्ड कमिटी कुर्डूवाडी (सदस्य ),मुन्ना मोरे सरपंच( बावी), कव्हे केंद्राचे प्रभारी केंद्रप्रमुख मा. सौ.संजीवनी उबाळे मॅडम, कुर्डूवाडी बीड चे विस्तार अधिकारी सौ शोभा लोंढे मॅडम, पंचायत समिती शिक्षण विभागाचे गटशिक्षण अधिकारी विकास



यादव, पंचायत समिती कुर्डूवाडी गटविकास अधिकारी महेश सुळे,शाळेचे मुख्याध्यापक यादगीरकर सर शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षिका उपस्थित होते.

तसेच कव्हे गावातील आजी माजी विद्यार्थी व पालकांनी पुरस्कार मिळाल्याबद्दल शेळके सरांचे अभिनंदन केले व पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

## परीक्षा केंद्रा बाहेर उभ्या असलेल्या बदमशाने विद्यार्थ्यांचा मोबाईल पळविला !

**दैनिक वादळ वार्ता**
**केज/गौतम बचुटे**


केज तालुक्यातील एका परीक्षा केंद्रा बाहेर उभ्या असलेल्या बदमशाने परीक्षार्थी विद्यार्थ्यांचा मोबाईल आणि पैसे लांबविल्याचा प्रकार घडला आहे. दि ७ मार्च रोजी केज तालुक्यातील काळेगाव येथील केंद्रावर रितेश बचुटे हा १२ वी चा विद्यार्थी गणित विषयाच्या परीक्षेला गेला होता. दरम्यान परीक्षा केंद्रात मोबाईल घेऊन जाणे प्रतिबंधित असल्याने त्याने त्याचा गडद निळया रंगाचा (SAMSUNG M-30) हा मोबाईल आणि मोबाईलच्या पाठीमागे कव्हरमध्ये ठेवलेले एक हजार रु. या वस्तू हे परीक्षा केंद्राच्या प्रवेशद्वारा जवळ उभ्या असलेल्या एका अनोळखी व्यक्तीकडे जमा केल्या. परीक्षार्थी विद्यार्थ्यांचा असा समज झाला की, तो प्रवेशद्वारा जवळ उभा असलेला भामटा हा एखाद्या परीक्षार्थी विद्यार्थ्यांचे पालक असावेत आणि ते प्राणिकपणे परीक्षा संपल्यास मोबाईल परत देतील. परंतु परीक्षा संपल्यास विद्यार्थी परीक्षा केंद्रा बाहेर आल्या नंतर त्याने त्या अनोखी व्यक्तीचा।शोध घेतला. तसेच त्याच्या स्वतःच्या फोनवर संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. मात्र तो भामटा तिथे नव्हता आणि त्याने मोबाईल बंद करून तो पसार झाला होता. त्याचा कोणताही ठावठिकाणा नसल्याने परीक्षार्थी विद्यार्थ्यांचा मोबाईल परत मिळाला नाही. सदर भामट्याने तो सॅमसंग कंपनीचा एम-३० निळ्या रंगाचा हा मोबाईल कोणाला विक्री केल्याचे किंवा वापर केल्याचे आढळून आल्यास त्याच्यावर कायदेशीर कारवाई केली जाईल.

## चिकन खाणाऱ्यांनो सावधान राहा, बर्ड फ्लूबाबत महत्वाची सूचना

**वादळवार्ता/नागपूर**

: नागपूरातील प्रादेशिक अंडी उबवणी केंद्रातील कोंबड्यांना बर्ड फ्लू रोग झाल्याचे निष्पन्न झाल्याने चिंता व्यक्त केली जात आहे. 2 मार्च रोजी या केंद्रात सर्वाधिक कोंबड्यांचा मृत्यू झाला होता. त्यानंतर या रोगाचा प्रादूर्भाव आणि प्रसार टाळण्यासाठी नागपूरातील प्रादेशिक अंडी उबवणी केंद्राच्या एक किलोमीटर त्रिज्येतील सर्व कुक्कुट पक्षांना शास्त्रोक्त पद्धतीने नष्ट करण्यात आले आहे. प्रादेशिक अंडी उबवणी केंद्र वगळून राज्यात इतरत्र कोठेही कोंबड्यांना प्रादुर्भाव झाल्याचे आढळून आलेले नाही तरीही नागपूर वगळता इतर क्षेत्रातील व्यक्तींनी कोंबडीचे मांस आणि अंडी नीट शिजवून खावीत असे आवाहन आरोग्य विभाग उपसंचालिका डॉ.कांचन वानेरे यांनी केले आहे. अंडी उबवणी केंद्रातील कर्मचाऱ्यांच्या घशातील स्त्रावाचे नमून देखील प्रयोग शाळेत तपासणीसाठी पाठविण्यात आले आहेत. राज्याची उपराजधानी नागपूरातील प्रादेशिक अंडी उबवणी केंद्रातील कोंबड्यांना बर्ड फ्लू झाल्याचे उघडकीस आल्याने खळबळ उडाली आहे. या कोंबड्यांचे नमूने पुणे आणि भोपाळ येथील प्रयोगशाळेत तपासणीसाठी नेण्यात आले होते. त्यावेळी तपासणीत अंडी उबवणी केंद्रातील कोंबड्यांचा मृत्यू एव्हियन इन्फ्ल्युएन्झा ( बर्ड फ्लू ) मुळे झाल्याचे निष्पन्न झाले. यामुळे या केंद्रातील साडे आठ हजार कोंबड्यांना मारुन त्या नष्ट करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. काय काळजी घ्यावी

प्राण्यांमधील संक्रमण आणि रोगप्रतिबंध तसेच नियंत्रण अधिनियम 2009 आणि बर्ड फ्लू नियंत्रण कृती आराखडा या नियमानूसार



नागपूर प्रादेशिक अंडी उबवणी केंद्रापासून 1 किलोमीटरचा परिसर बाधीत क्षेत्र म्हणून घोषीत केला होता. तर केंद्रापासूनचा 10 किलोमीटरपर्यंतचा परिसर हे निगराणी क्षेत्र म्हणून घोषीत केले असल्याचे जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर यांनी म्हटले आहे. राज्यातील इतर भागातील कोंबड्यांना या आजाराची बाधा झालेली नसल्याने इतर क्षेत्रातील कोंबडीचे मास आणि अंडी योग्यरित्या शिजवून सेवन करण्यास हरकत नाही असे डॉ.कांचन वानेरे यांनी म्हटले आहे. अंडी-चिकन खावे किंवा कसे याबाबत वेगवेगळ्या शंका आणि अफवा पसरविल्या जात आहेत. अशा कोणत्याही अफवांवर विश्वास ठेऊ नये, असे आवाहनही त्यांनी केले. आजारी कोंबड्यांचे नीट शिजवलेले नसल्यास माणसांना देखील बर्ड फ्लू होऊ शकतो. ज्या ठिकाणी एव्हीयन इनफ्ल्यूएंजा सारखा आजार आढळतो अशा रुग्णांना आयसोलेटेड करुन त्यांच्या घशातील सॅम्पल्स तपासणीसाठी घेणार आहे.

## संपादकीय

### जुने तेच सोने!

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषद पाचवी आणि आठवीच्या वर्गांसाठी वार्षिक परीक्षा, पुनर्परीक्षा व मूल्यमापन यांची कार्यपद्धती निश्चित करत आहे. पाचवी आणि आठवी हे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक जीवनातील महत्त्वाचे टप्पे आहेत. त्यामुळे त्या टप्प्यापर्यंत त्यांना शिकवलेल्या गोष्टी व्यवस्थित समजल्या आहेत की नाही, याची पडताळणी होण्याच्या दृष्टीने परीक्षा घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तशी पूर्वीचीच सर्व वर्गात परीक्षा ही पद्धत योग्य होती. गुणवंत विद्यार्थी बरोबर गाळून पुढील उच्च शिक्षणासाठी पाठवली जात होती. पुन्हा "जुने तेच सोने" हे सत्य शासनाच्या प्रत्ययास येत आहे. श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजींचा सदर लेख शासनाची उपरती दर्शवित आहे.... संपादक.

राज्यात नवे शैक्षणिक धोरण लागू करायचे असेल, तर गुणवत्तेच्या दृष्टीने पहिलीपासून आठवीपर्यंत नापास करायचे नाही, हे परवडणारे नाही, हे लक्षात आल्यावर शालेय शिक्षण विभाग यावर्षीपासून पाचवी आणि आठवीच्या वर्गांच्या वार्षिक परीक्षा घेणार आहे. पाचवी आणि आठवी या टप्प्यांवर प्रत्येक विद्यार्थ्याच्या गुणवत्तेची परीक्षा होणार आहे. राज्य शिक्षण मंडळाच्या अनुदानित आणि विनाअनुदानित सर्व शाळांना हा नियम लागू असेल. शिक्षण विभाग बिनकामाचे नियम निर्गमित करून विद्यार्थी, पालक व शिक्षक यांचे माथे भडकून घेते, त्यातून काही एक साध्य होत नाही. हा नेहमीचाच उपद्रव झाला आहे; ज्याला विभाग नवीन प्रयोग असे गोजिरवाणे संबोधन लावत असतो. बालकांचा मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाचा हक्क कायद्यानुसार विद्यार्थ्यांना आठवीपर्यंत अनुत्तीर्ण करता येत नव्हते. मात्र, विद्यार्थ्यांचे सातत्यपूर्ण मूल्यमापन करण्याची सक्ती या कायद्यात होती. त्याकडे दुर्लक्ष झाल्याने विद्यार्थी बहुतांश विषयात कच्चा राहू लागले. त्यांची गुणवत्ता थेट नववीच्या वार्षिक परीक्षेत मोजली जाऊ लागल्याने विद्यार्थी परीक्षेत अपयशी ठरत होते. आता नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण लागू करावे लागणार आहे. यात गुणवत्तेला अधिक प्राधान्य आहे. म्हणून शालेय शिक्षणात दोन टप्प्यांवर विद्यार्थ्यांची गुणवत्ता जोखण्याचा निर्णय शिक्षण विभागाने घेतला आहे. त्यासाठी महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम २०११मध्ये राज्य सरकारने सुधारणा केली आहे, असे दिसते. ते सूर्यप्रकाशात स्पष्टपणे पुढे दिसणारच आहे. सुधारित नियमांनुसार इयत्ता पाचवीच्या वर्गापर्यंत बालकाला वयानुरूप वर्गामध्ये प्रवेश देण्यात येईल. इयत्ता सहावी ते आठवीच्या वर्गात वयानुरूप प्रवेश देताना बालकास पाचवीच्या वर्गासाठीची विहित केलेली वार्षिक परीक्षा उत्तीर्ण होणे बंधनकारक राहील. बालक ही परीक्षा उत्तीर्ण नसल्यास त्या बालकाला पाचवीच्या वर्गात प्रवेश देण्यात येईल. यामुळे आता शाळेतील प्रवेशाच्या एक टप्प्यावर म्हणजे पाचवीला परीक्षा देत त्याची गुणवत्ता सिद्ध करावी लागणार आहे. त्यामुळे शिक्षक आणि पालक या दोघांचीही शैक्षणिक जबाबदारी वाढणार आहे. नेहमीप्रमाणे डोकेदुखी पाठ सोडणारच कशी? यासंबंधी अधिसूचना जारी करण्यात आली आहे.

विद्यार्थ्यांनी पुढील वर्गात जाण्यासाठी गुणवत्ता सिद्ध करता यावी म्हणून प्रत्येक शैक्षणिक वर्षाच्या शेवटी पाचवी आणि आठवीच्या वर्गासाठी वार्षिक परीक्षा घेतली जाणार आहे. विद्यार्थी वार्षिक परीक्षा उत्तीर्ण होऊ शकला नाही, तर अशा बालकाला संबंधित विषयासाठी शाळेला अतिरिक्त पूरक मार्गदर्शन द्यावे लागेल आणि वार्षिक परीक्षेचा निकाल जाहीर झाल्यापासून दोन महिन्यांच्या आत त्याची पुनर्परीक्षा घ्यावी लागेल. विद्यार्थी पुनर्परीक्षेत नापास झाले, तर त्यांना पाचवी किंवा आठवीच्या वर्गात, जसे असेल तसे ठेवले जाईल. मात्र, प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत कोणत्याही बालकाला शाळेतून काढून टाकले जाणार नाही, असाही दिलासा दिला जात आहे. पहिलीपासून परीक्षाच नाही, असा समज झाला होता. परंतु प्रत्येक वर्गातील विद्यार्थ्याचे सर्वंकष मूल्यमापन झाले पाहिजे. त्यामुळे पाचवी आणि आठवीला वार्षिक परीक्षा सुरू होणार असेल, तर त्याचे स्वागत आहे. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये अभ्यासाविषयी गांभीर्य रुजेल आणि शैक्षणिक गुणवत्तेत वाढ होण्यासही मदत होईल, असा शेवटी सकारात्मक विचार करणेच महत्वाचा ठरतो, हेच खरे!

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषद पाचवी आणि आठवीच्या वर्गांसाठी वार्षिक परीक्षा, पुनर्परीक्षा व मूल्यमापन यांची कार्यपद्धती निश्चित करत आहे. पाचवी आणि आठवी हे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक जीवनातील महत्त्वाचे टप्पे आहेत. त्यामुळे त्या टप्प्यापर्यंत त्यांना शिकवलेल्या गोष्टी व्यवस्थित समजल्या आहेत की नाही, याची पडताळणी होण्याच्या दृष्टीने परीक्षा घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. पाचवी ते आठवीच्या परीक्षांत नापासही केले जाणार, अशी नुसतीच भिती दाखविली जात आहे, मात्र प्रत्यक्षात तो पहिल्याच प्रयत्नात पास होईल, यासाठी शाळा प्रयत्नशील असेल, हे निश्चित! पाचवीला ५० गुणांची, तर आठवीला ६० गुणांची वार्षिक परीक्षा घेतली जाईल,

# छत्रपती संभाजी आणि कवी कलश!

(छत्रपती संभाजी राजे भोसले बलिदान दिवस.)

छत्रपती संभाजी महाराजांनी आपल्या शौर्याने आपले नाव भारताच्या इतिहासाच्या पानावर सुवर्ण अक्षरांनी कोरले होते. कारण मुघल सम्राट औरंगजेबाच्या लाखो क्रूरता आणि प्रयत्नांनंतरही संभाजींनी धर्म बदलला नाही. त्यामुळे वयाच्या अवघ्या ३१व्या वर्षी क्रूर औरंगजेबाने संभाजी महाराजांची हत्या केली. लहानपणापासून ते मुघल साम्राज्याच्या विरोधात असायचे. त्यामुळं महाराजांचं साम्राज्य मुघल, सिंधी, म्हैसूर आणि पोर्तुगालमध्ये पसरलं होतं. याहून अधिक रोचक व रोमांचक माहिती श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजींच्या सदर संकलित लेखातून वेचून घ्याच... संपादक.

मराठा साम्राज्याचे दुसरे शासक आणि शिवाजी महाराजांचे ज्येष्ठ पुत्र संभाजी भोंसले यांचा जन्म दि.१४ मे १६५७ रोजी पुण्याजवळील पुरंदर किल्ल्यावर झाला. छत्रपती संभाजी महाराज हे औरंगजेबाचे सर्वात शक्तिशाली प्रतिस्पर्धी होते. त्याने मुघल साम्राज्यातील दोन महत्त्वाचे किल्ले, विजापूर आणि गोलकोंडा आपल्या स्नायूंच्या बळावर हल्ला करून काबीज केले होते. छत्रपती संभाजी महाराजांनी आपल्या शौर्याने आपले नाव भारताच्या इतिहासाच्या पानावर सुवर्ण अक्षरांनी कोरले होते. कारण मुघल सम्राट औरंगजेबाच्या लाखो क्रूरता आणि प्रयत्नांनंतरही संभाजींनी धर्म बदलला नाही. त्यामुळे वयाच्या अवघ्या ३१व्या वर्षी क्रूर औरंगजेबाने संभाजी महाराजांची हत्या केली. लहानपणापासून ते मुघल साम्राज्याच्या विरोधात असायचे. त्यामुळं महाराजांचं साम्राज्य मुघल, सिंधी, म्हैसूर आणि पोर्तुगालमध्ये पसरलं होतं.

लहानपणी संभाजी महाराजांचे संगोपन त्यांच्या आजी दादी जिजाबाई यांनी केले. कारण संभाजी महाराजांनी वयाच्या अवघ्या दुसऱ्या वर्षी आई सईबाई गमावल्या होत्या. संभाजी महाराजांचे दुसरे नाव चावा. मराठी भाषेत छावा म्हणजे सिंहाचे बाळ. संभाजी महाराजांच्या शिक्षणाविषयी सांगायचे तर महाराजांना संस्कृतसह १३ भाषांचे ज्ञान होते. घोडेस्वारी, धनुर्विद्या आणि तलवारबाजी यात ते लहानपणापासूनच निपुण होते. संभाजींनी अनेक शास्त्रेही लिहिली होती. वयाच्या अवघ्या ९व्या वर्षी संभाजी राजे यांना अंबरचा राजा जयसिंग यांच्याकडे राहायला पाठवण्यात आले. कारण तो राजकीय दावे मोठ्या समजुतीने शिकतो.

संभाजी महाराज हे भारताचे महाराजा वीर छत्रपती शिवाजी यांचे पुत्र होते. त्यांच्या आईचे नाव सईबाई होते. सईबाई या छत्रपती शिवरायांच्या दुसऱ्या पत्नी होत्या. संभाजी राजेंच्या कुटुंबात आई-वडिलांशिवाय आजोबा शहाजी राजे, आजी जिजाबाई आणि भावंडे होते. त्यांचे वडील शिवाजी महाराजांना तीन बायका होत्या. सईबाई, सोयराबाई आणि पुतलाबाई अशी तिची नावे होती. संभाजी महाराजांचे एक भाऊ राजाराम छत्रपती होते. तो सोयराबाईचा मुलगा होता. त्याशिवाय महाराजांना शकूबाई, अंबिकाबाई, राणूबाई जाधव, दीपाबाई, कमलाबाई पालकर आणि राजकुंवरबाई शिर्के या बहिणी होत्या. संभाजी महाराजांचा विवाह येसूबाईशी झाला. त्यांना छत्रपती साहू नावाचा मुलगा आणि भवानीबाई नावाची मुलगी देखील होती. छत्रपती संभाजी महाराज आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्यात चांगले संबंध नव्हते. संभाजींचे बालपण अडचणीत आणि प्रतिकूल परिस्थितीत गेले. संभाजीची सावत्र आई सोयराबाईला आपला मुलगा राजाराम याला शिवाजीचा उत्तराधिकारी बनवायचा होता. त्यामुळे छत्रपती शिवाजी आणि संभाजी यांचे संबंध बिघडले होते. संभाजी महाराजांनी अनेक वेळा शौर्य दाखवले होते. पण शिवाजी आणि त्याच्या कुटुंबाचा संभाजीवर विश्वास नव्हता. शिवाजी महाराजांनीही एकेकाळी शिक्षा दिली होती. पण तो निसटला आणि मुघलांमध्ये सामील झाला. त्या काळात शिवाजी महाराजांच्या अडचणी वाढल्या होत्या. पण संभाजींनी पाहिले की मुघल हिंदूंवर अत्याचार करतात. म्हणून तो मुघलांची बाजू सोडून परत शिवाजीकडे माफी मागायला आला.

छ.संभाजी महाराज लहानपणी मुघल शासक औरंगजेबाच्या कैदेतून सुटले होते. त्यावेळी शिवाजी महाराजांचे मंत्री रघुनाथ कोरडे यांच्या एका दूरच्या नातेवाईकाकडे तो जवळपास दीड वर्ष अज्ञातवासात राहत होता. त्या काळात संभाजी काही काळ ब्राह्मण मुलगा म्हणून राहिले आणि महाराजांचे उपनयन संस्कारही मथुरेतच झाले. त्यावेळी ते संस्कृतही शिकले आणि मग संभाजीची ओळख कवी कलश यांच्याशी झाली. असे म्हटले जाते. संभाजी महाराजांचा उग्र आणि बंडखोर स्वभाव फक्त कवी कलशच हाताळू शकला. संभाजी महाराजांची साहित्य निर्मिती- बुधभूषणम, नायिकाभेद, सातशातक, नखशिखान्त, श्रृंगारिका ही होती.

संभाजी महाराजांनी वयाच्या १६व्या वर्षी आयुष्यातील पहिले युद्ध लढले. त्यात महाराजांचा विजय झाला. महाराज युद्धात ७ किलो वजनाची तलवार घेऊन लढायचे. त्यांचे वडील छ.शिवाजी महाराज यांचे सन १६८१ मध्ये निधन झाले. त्यानंतर त्यांनी कधीही मागे वळून पाहिले नाही आणि सर्वात मोठा शत्रू औरंगजेबाला त्रास दिला. छत्रपती संभाजी महाराजांनी आयुष्यात १२० लढाया केल्या. त्यानंतरही महाराजांचा एकाही लढाईत पराभव झाला नाही. त्याने सर्व लढाया जिंकल्या.

छ.शिवाजी महाराजांचा मृत्यू झाला तेव्हा मराठ्यांना अनेक संकटांचा सामना करावा लागला. त्या परिस्थितीत संभाजींनी राज्याची जबाबदारी घेतली. संभाजी महाराजांचे भाऊ राजाराम यांना गादीवर बसवण्यासाठी अनेकांनी प्रयत्न केले. मात्र सेनापती हंबीरराव मोहिते यांच्यासमोर त्यांना यश आले नाही. दि.१६ जानेवारी १६८१ रोजी संभाजी महाराजांचा राज्याभिषेक झाला. सम्राट औरंगजेब हा त्यावेळी मराठ्यांचा सर्वात मोठा शत्रू होता. त्यावर्षी औरंगजेब दक्षिणेकडील पठारावर आला. सन १६८२मध्ये औरंगजेबाने ५४ लाख प्राण्यांच्या सैन्यासह रामसे किल्ल्याला वेढा घालण्याचा प्रयत्न केला. पण यश मिळू शकले नाही. संभाजी महाराजांनी आयुष्यभर हिंदू धर्माच्या हितासाठी मोठे यश संपादन केले होते. त्यांनी औरंगजेबाच्या प्रचंड सैन्याला तोंड देत मुघलांचा पराभव केला. त्यांनी उत्तर भारतातील हिंदू राज्यकर्त्यांना औरंगजेबापासून त्यांचे राज्य परत मिळवून शांतता प्रस्थापित करण्यास मदत केली. त्यांच्यामुळेच शूर मराठे आणि संपूर्ण राष्ट्रातील हिंदू त्यांचे ऋणी आहेत. संभाजी महाराजांचे सर्वात मोठे यश म्हणजे त्यांचे राज्य हिंदू राजांना परत मिळवून देणे.

संभाजी आणि इतर राजांमुळे औरंगजेबाने दक्षिणेत २७ वर्षे लढा दिला, तोपर्यंत उत्तरेकडील बुंदेलखंड, पंजाब आणि राजस्थान या हिंदू राज्यांमध्ये हिंदू धर्माचे रक्षण झाले. महाराष्ट्रातील किंवा देशाच्या पश्चिम घाटातील मराठा सैनिक आणि मुघलांना हे शक्य झाले नाही. परंतु संभाजी राजे केवळ बाह्य आक्रमकांपासूनच नव्हे तर राज्यातील शत्रूंकडूनही पडले. त्यावेळी शूर मराठे आणि मुघलांच्या रक्ताने पृथ्वी सतत भिजलेली होती.

सन १६८९मध्ये मुघलांची दहशत वाढली आणि मुकर्रब खानने हल्ला केला. त्यात मुघल सैन्य राजवाड्यात पोहोचले आणि संभाजी महाराज आणि कवी कलश यांना कैद केले. दोघांनाही तुरुंगात डांबण्यात आले आणि त्यांना इस्लाम स्वीकारण्यास फर्मावले गेले. औरंगजेबाने छ.संभाजींना पाहिल्यावर तो सिंहासनावरून खाली आला आणि म्हणाला, "शिवाजीचा मुलगा माझ्यासमोर उभा राहणे ही माझ्यासाठी मोठी उपलब्धी आहे." आणि त्याला त्याच्या अल्लाहची आठवण झाली. कवी कलश यांनाही बेड्या घालण्यात आल्या होत्या. तरीही तो म्हणाला, की बघ मराठी राजा, तो स्वतः सिंहासनावरून उठला आणि तुला नमस्कार केला आहे. हे ऐकून औरंगजेबाला राग आला. मुघलांनी संभाजीला सांगितले, की जर त्याने राज्य आणि किल्ला मुघलांना दिला तर तो त्याला जिवंत ठेवू शकतो. पण वीर संभाजींनी नकार दिला. औरंगजेब म्हणाला, की संभाजींनी इस्लाम स्वीकारला तर ते शांततेत राहू शकतील. पण ते संभाजीला मान्य नव्हते. तेव्हा मुघलांनी संभाजी आणि कवी कलश यांच्यावर अनेक अत्याचार केले होते. संभाजी महाराज आणि कवी कलश यांनी इस्लाम स्वीकारण्यास नकार दिल्याने औरंगजेब खूप संतापला होता. संभाजी महाराजांच्या जखमेवर मीठ चोळले. त्यानंतर, त्याला त्याच्या सिंहासनावर ओढण्यास सांगितले गेले. त्यावेळी औरंगजेबाने संभाजी महाराजांची जीभ कापून सिंहासनासमोर ठेवली आणि कुत्र्यांना खाऊ घालण्याचा आदेश दिला. एवढे सगळे होऊनही संभाजी हसत हसत औरंगजेबाकडे बघत होते. त्यामुळे क्रूर राजाने डोळे काढले आणि त्याचे हातही कापले गेले.

हात कापल्याच्या दोन आठवड्यांनंतर दि.११ मार्च १६८९ रोजी संभाजींचा शिरच्छेद करण्यात आला. हिंदू सम्राट वीर संभाजी महाराज यांचे छिन्नविछिन्न शीर चौकाचौकात फिरवण्यात आले आणि मृतदेहाचे तुकडे तुकडे करून कुत्र्यांना टाकले गेले. शिवपुत्र संभाजी महाराज यांचे जीवन देश आणि हिंदुत्वासाठी समर्पित आहे. संभाजी महाराज बलिदान दिन म्हणजे ११ मार्च होय. हा दिवस त्यांच्या मृत्यूच्या दिवशी साजरा केला जातो. संभाजी महाराज स्वातंत्र्यासाठी मोठ्या लढाईला सामोरे गेले आणि शहीद झाले. त्यांच्या स्मृतीसाठी हा दिवस साजरा केला जातो.

!! बलिदान दिनी छ.संभाजी महाराजांना कोटी कोटी विनम्र अभिवादन !

**संकलन व सुलेखन -**
**श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी.**
**पोटेगावरोड, गडचिरोली.**
**फक्त मधुभाष- 7132667983.**

# धक्कादायक सहाय्यक पोलीस निरीक्षकाचा मृतदेह रेल्वे पटरीवर आढळला

**दैनिक वादळ वार्ता**
**परळी/सालम चाऊस**

परळी - बीड पोलीस दलात असणाऱ्या सहाय्यक पोलीस निरीक्षकाचा मृतदेह परळी रेल्वे स्टेशनपासून साधारण पाचशे ते मीटर अंतरावर सिमेंट फॅक्टरीच्या जवळ आढळून आला. रेल्वे पटरिवर असलेल्या या मृतदेहाचे दोन तुकडे झालेले होते. ही धक्कादायक घटना आज सकाळी समोर आली. रेल्वे पोलीस पुढील तपास करीत आहेत आहेत. प्राथमिक माहितीनुसार सुभाष दुधाळ असे मयत पोलीस अधिकाऱ्याचे नाव आहे. सदरील घटना रात्री उशिरा घडली असावी असा अंदाज आहे. दरम्यान, हा आत्महत्येचा प्रकार आहे की अन्य काही हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. आज दि.९ मार्च रोजी सात वाजता पोलिसांना स्टेशन मास्तरने सांगितल्यानंतर पोलिसांनी मृतदेह परळी येथील ग्रामीण उपजिल्हा रुग्णालयात हलवला. या धक्कादायक घटनेने परळी शहरात मोठी खळबळ उडाली आहे. याबाबत अधिक तपास रेल्वे पोलीस करत आहेत



## पोलिस भरतीचा फॉर्म भरता येईना; मराठा विद्यार्थ्यांनी अनिलदादा जगताप यांच्याकडे मांडल्या व्यथा!

### शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांना दिले



**वादळवार्ता/अंबाजोगाई**

खेळाडूंनी आपले खेळाडूपणाचे खेळ दाखविल्या यश निश्चित मिळते व विजय संपादन करू शकता असा विश्वास सामाजिक ज्येष्ठ नेते नंदकिशोर मुंदडा यांनी व्यक्त केले. अंबाजोगाई येथे शुक्रवारी राजस्थानी परिवाराच्या वतीने राजस्थानी प्रीमियम लीग क्रिकेट स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अंबाजोगाई पीपल्स बँकेचे उपाध्यक्ष प्रकाशचंद सोळंकी होते. तर उद्घाटक म्हणून सामाजिक जेष्ठ नेते नंदकिशोर मुंदडा हे होते. प्रमुख अतिथी म्हणून माजी नगरसेवक नंदा महाराज वैष्णव,पिपल्स बँकेचे संचालक पुरुषोत्तम चोपडा, प्रकाश लखेरा, माहेश्वरी समाजाचे जिल्हाध्यक्ष ऍड.ललित तोष्णीवाल, तालुकाध्यक्ष दत्ताप्रसाद लोहिया, आनंद कर्नावट, युवा अध्यक्ष रोहन मुंदडा, संदीप पारिख, शिवप्रसाद शर्मा अमित रांदड, भरत लखेरा, किरण भन्साळी,अभिमन्यू वैष्णव आदी व्यासपीठावर उपस्थित होते.

पुढे बोलताना नंदकिशोर मुंदडा म्हणाले की, राजस्थानी समाजातर्फे यावर्षी दुसऱ्यांदा क्रिकेट स्पर्धेचे आयोजन केले आहे. ही चांगली बाब आहे. अशा खेळामुळे राजस्थानी समाज युवा पिढी एकत्र येत असल्याचा आनंद त्यांनी व्यक्त केला. तसेच विविध खेळामुळे आपले आरोग्य हे व्यवस्थित राहते. खेळाडूंनी आपला खेळ दाखवून विजय कसा संपादित करता येईल यासाठी प्रयत्न करावे, खेळाडूंनी प्रयत्न केल्यास यश निश्चित मिळते तसेच ह्या क्रिकेट स्पर्धा तालुकास्तरावर मर्यादित न ठेवता जिल्हा,राज्यस्तरीय स्पर्धा आयोजन करावे यासाठी प्रयत्न करावे अशी आशा त्यांनी व्यक्त केली. यावेळी नंदा महाराज वैष्णव यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

क्रिकेट लीग स्पर्धेचे उद्घाटन नंदकिशोर मुंदडा यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी आयोजक शुभम लखेरा,अमित रांदड आदित्य लोढा,सुरज बजाज, कमलेश लखेरा, प्रशांत तापडिया, साहिल लखेरा,किरण भन्साळी आदेश कर्नावट, शुभम भन्साळी, सुशील रांदड, प्रशांत तापडिया,अमित भंडारी,योगेश खंडेलवाल, गौरव लोहिया आदी क्रिकेट स्पर्धा यशस्वी होण्यासाठी परिश्रम घेत आहेत. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अशोक तापडे यांनी केले. तर उपस्थिती प्रमुख पाहुण्यांचे व खेळाडूंचे आभार अमित रांदड यांनी मानले.या क्रिकेट स्पर्धेत एकूण सहा संघ सहभागी झाले आहेत.

# आज कास्ट्राईब राज्य परिवहन कर्मचारी संघटना बीड विभागाच्या वार्षिक सर्वसाधारण सभा

**वादळवार्ता/बीड**

अनुसूचित जाती जमाती आयोग भारत सरकार व महाराष्ट्र शासन मान्यता प्राप्त कास्ट्राईब राज्य परिवहन कर्मचारी संघटना बीड विभागाच्या वार्षिक सर्वसाधारण सभा नीलकमल एक्झिटिव्ह हॉटेल बीड तहसील कार्यालय बीड समोर दि.१०/०३/२०२४ रोजी दुपारी १ वाजता संपन्न होत आहे या कार्यक्रमाला विभागीय अध्यक्ष ससाने सुरेश यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न होत आहे या सभेला प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्राचे अध्यक्ष धर्मपाल ताकसांडे तसेच माननीय सुनील भाऊ निर्भवणे महाराष्ट्र सरचिटणीस तसेच माननीय सदानंद कांबळे महाराष्ट्र कोषाध्यक्ष माननीय के एस भोले महाराष्ट्र अतिरिक्त सरचिटणीस माननीय किशोर कुमार वाघमारे केंद्रीय कार्यकारणी सदस्य माननीय डीव्ही गायकवाड मामा मुख्य सल्लागार



माननीय सुभाष कोकाटे प्रादेशिक कोषाध्यक्ष माननीय संदीप खंडागळे प्रादेशिक अध्यक्ष गणेश कांबळे नांदेड,बीएस खंदारे प्रादेशिक सचिव शेख मेहुद्दीन प्रादेशिक कार्याध्यक्ष महंमद अब्दुल रियाज विभागीय सचिव सुंदर वीर विभागीय कोषाध्यक्ष तसेच मोहम्मद रफी शेख मनावर भीमा कांबळे तसेच इतर आगारातून येणारे अनिल बनसोडे बालाजी सरवदे चंदनशिवे नितीन वाघमारे अंबाजोगाई आगार तसेच धनंजय कांबळे चव्हाण पोटभरे धारूर आगार तसेच गेवराई राजेश मस्के गेवराई आगार साळवे गायकवाड बाबुराव राजरत्न जाधव ढाकणे आष्टी आगार तसेच प्रशांत निसर्ग संतोष मगरे सय्यद संतोष वाघमारे बडे साहेब गरजे साहेब लगड साहेब शिंदे माजलगाव आगार परळीहून सोनवणे गोदाम साहेब भारत माने यांच्या उपस्थितीमध्ये कार्यक्रम पार पडणार आहे.तरी सर्व आगाराचे पदाधिकारी व सभासद यांनी कर्माला उपस्थित राहावे असे आव्हान बीड विभागाच्या वतीने करण्यात आलेले.

# भगर खाल्ल्याने अनेक भागात विषबाधेचे प्रकार, उपवासाला भगर न खाण्याचे सरकारचे आवाहन

### राज्यात उपवासाला भगरीचे सेवन केल्यानंतर विषबाधा झाल्याच्या अनेक घटना घडल्याने सरकारने शक्यतो भगर खाऊच नका असे आवाहन

**दैनिक वादळ वार्ता**

राज्यातील अनेक भागात उपवासाला मोठ्या प्रमाणात भगर खाल्ली जात असते. भगरीमुळे अन्न विषबाधा झाल्याच्या अनेक घटना महाराष्ट्रात आणि नांदेड जिल्ह्यात घडल्यामुळे सरकारने उपवासाला शक्यतो भगर खाऊ नये असे आवाहन राज्यातील जनतेला केले आहे. भगर खरेदी करताना काय काळजी घ्यावयाची याचे परिपत्रक राज्य सरकारने काढले आहे. कोंदट वातावरणात भगरीवर तात्काळ बुरशी लागत असल्याने जनतेने भगरी खाताना अत्यंत सावधानचा बाळगण्याची गरज असल्याचे म्हटले आहे.

महाराष्ट्रात उपवासाला भगरीचे सेवन मोठ्या प्रमाणावर केले जाते. परंतू ही भगर विषबाधेला निमंत्रण देते. भगरीवर मोठ्या प्रमाणात अस्परजिलस ( Aspergillus ) प्रजातीच्या बुरशीचा प्रादुर्भाव होतो. त्यामुळे फ्युमिगाक्लेविन ( Fumigaclavine ) यासारखी विषद्रव्ये ( Toxins ) तयार होतात. आद्रतेमुळे बुरशीच्या वाढीसाठी पोषक वातावरण तयार होते. अशी बुरशी झालेली भगर जर सेवन केली तर अन्न विषबाधा होण्याचा मोठा धोका असतो. त्यामुळे भगर खाताना काळजी घेण्याचे आदेश प्रशासनाने दिले आहेत.




भगर खाताना नेमकी काय काळजी घ्यावी

१) बाजारातून भगर आणल्यानंतर ती निवडून स्वच्छ करावी. शक्यतो पाकीटबंद भगर घ्यावी. कंपनीचे ब्रँड नाव नसलेली किंवा लेबल नसलेली भगर पाकीटे आणि सूटी भगर घेऊ नका, भगर खरेदी करताना पाकीटावरचा पॅकींग दिनांक आणि एक्सपायरी डेट तपासू घ्या

२) भगर साठवताना ती स्वच्छ कोरड्या ठिकाणी, व्यवस्थित झाकणबंद डब्यात ठेवावी, त्यामुळे बुरशीची वाढ होणार नाही. जास्त दिवस भगर साठवून ठेवू नका, जास्त दिवस साठवलेली भगर खाऊ नका.

३) शक्यतोवर भगरीचे पीठ विकत आणू नका. भगरीच्या पिठामध्ये वातावरणातील ओलावा शोषून घेण्याची क्षमता अधिक असते. त्यामुळे पिठाला बुरशीची लागण होण्याची शक्यता जास्त असते. भगरीच्या दशम्या किंवा भाकरी खाण्याऐवजी खिचडी खावी.

४) भगरीचे पीठ आवश्यक असेल तेवढेच दळून घ्या. जास्त दिवस पीठ साठवू नका. बाहेरुन दळून आणण्यापेक्षा घरीच दळा.

५) भगर आणि शेंगदाणे हे अधिक प्रथिनयुक्त पदार्थ आहेत. दोन ते तिन दिवस सलग उपवास असताना या पदार्थाचे सेवन ॲसिडीटी वाढण्यास कारणीभूत ठरते. त्यामुळे उलटी, मळमळ आणि पोटाचे त्रास होतात. या पदार्थांचे सेवन पचनशक्तीनुसार मर्यादितच करावे.

# सेंटरवर फोटो निघाले पण परीक्षेतील कॉपी मात्र रोखलीचं नाही-अँड. अजित देशमुख

**वादळवार्ता/बीड**

गुणवत्ता ही फक्त मार्कांवर अवलंबून नाही. तर विद्यार्थ्यांचे मेंदूमध्ये अभ्यास कशा पद्धतीने रुजला, हे महत्त्वाचे आहे. त्यामुळे परीक्षेतील कॉफी मुक्ती आवश्यक होती. मात्र अखेर कॉपीमुक्ती झालीच नाही. परीक्षा केंद्रावर जाऊन एखादा फोटो काढून भेट दिल्याचे दाखवून कॉपीमुक्त परीक्षा होत नसतात. हे आम्ही काही वर्षांपूर्वी दाखवून दिले होते. त्यानंतर कॉपीमुक्त परीक्षा कधी झाल्याच नाहीत, अशी खंत जन आंदोलनाचे विश्वस्त अँड. अजित एम. देशमुख यांनी व्यक्त केली आहे. नुकत्याच संपलेल्या बारावीच्या आणि चालू असलेल्या दहावीच्या परीक्षेमध्ये कॉपीचे पेव फुटलेले आहे. मात्र याकडे जिल्हा प्रशासन अजिबात लक्ष देत नाही. कोणत्या तरी अधिकाऱ्यांने कुठे तरी जाऊन परीक्षा हॉलमधील फोटो टाकला आणि तो जनते पर्यंत पोहोचवला, तर एवढ्याने कॉपी थांबणार नाही. कॉफीमुक्त परीक्षेसाठी अहोरात्र प्रयत्न करावे लागतात. ते आम्ही मागील काही वर्षांपूर्वी केले होते. ज्याप्रमाणे राजकारण सडत चालले आहे, त्याप्रमाणे शिक्षण प्रणाली सडत ठेवण्याचा प्रयत्न प्रशासनाकडून होत आहे का ? हा प्रश्न देखील यावेळी उपस्थित होत आहे. विद्यार्थ्यांना वर्षभर अभ्यास करायचा, असे सांगून शेवटच्या टप्प्यात पालक देखील कॉपी पुरवत असतील तर त्यापेक्षा वेगळी खंत कोणती आहे, असे देखील चित्र निर्माण होत आहे. गुणवत्ता विकास करण्याचा ध्यास आता संपला आहे. त्यामुळे विद्यार्थी आणि पालक यांची देखील फरफट झाली आहे. कॉपीमुक्त परीक्षा ही फक्त घोषणा ठरत आहे. ज्या अधिकाऱ्याला परीक्षेत कॉपी होत नाही, असे म्हणायचे आहे, त्यांनी आजच त्याची भूमिका स्पष्ट केली तर उद्या कुठे आणि कशी कॉपी होते, हे आपण त्या अधिकाऱ्याला दाखवून देऊ, असेही देशमुख यांनी म्हटले आहे .

# जिल्हातील ३३८३ अंगणवाडी सेविकांना कामकाजासाठी नवे मोबाईल्स, पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्या हस्ते वितरणास सुरुवात

**वादळवार्ता/परळी वैद्यनाथ**

बीड जिल्ह्यातील अंगणवाडी सेविकांना ऑनलाइन पद्धतीने त्यांचे दैनंदिन कामकाज करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या वतीने स्मार्ट मोबाईल फोन देण्यात आले असून जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्या हस्ते परळी येथे आज या मोबाईल फोन्सच्या वितरणास प्रातिनिधिक स्वरूपात सुरुवात करण्यात आली. जिल्ह्यातील एकूण ३३८३ अंगणवाडी सेविकांना हे अध्यायावत स्मार्ट मोबाइल फोन्स देण्यात येणार असून याद्वारे ऑनलाईन पद्धतीने केले जाणारे काम अधिक सोयीचे व जलद गतीने होणार आहे. बीड जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्या हस्ते त्यांच्या जगमित्र या संपर्क कार्यालयात आज परळी तालुक्यातील ४५ अंगणवाडी सेविकांना प्रातिनिधीक स्वरूपात मोबाईल फोन वाटप करून याची सुरुवात करण्यात आली; यावेळी




ज्येष्ठ नेते वाल्मिक अण्णा कराड, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुका अध्यक्ष वैजनाथराव सोळंके, रामेश्वर महाराज कोकाटे, बीड जिल्हा परिषदेचे महिला व बालविकास विभागाचे जिल्हा कार्यक्रम अधिकारी चंद्रशेखर केकान यांसह कर्मचारी, अधिकारी तसेच अंगणवाडी सेविका उपस्थित होत्या.

दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे एकमेव दैनिक
वादळ वार्ता

## चौसाळा येथे हजरत सैलानी बाबा संदल निमित्त बुधवारी बैठकिचे आयोजन

वादळवार्ता/बीड प्रतिवर्षाप्रमाणे याहीवर्षी हजरत सैलानी बाबा संदल निमित्त बैठकिचे आयोजन करण्यात आले असुन या बैठकीमध्ये मागील वर्षीचा खर्चाचा हिशोब देवुन या वर्षी नवीन कार्यकारीणी निवडण्यात येणार असुन सदरील बैठक बुधवार दि.१३/०३/२०२४ रोजी सकाळी १० वाजता शासकिय विश्रामगृह चौसाळा याठिकाणी आयोजित करण्यात आली आहे तरी चौसाळा व परिसरातील नागरिकांनी मोठया संख्येने उपस्थीत राहण्याचे आवाहन कमिटीच्या व गावकरयांच्या वतीने करण्यात आले आहे



# मनोज जरांगे पाटील यांच्या संवाद यात्रेत बहुसंख्येने उपस्थित रहावे सकल मराठा समाज

**वादळवार्ता/केज**
केज या ठिकाणी दि.९ मार्च रोजी सकल मराठा समाजाच्या वतीने बैठकीचे आयोजन करण्यात आले होते येणाऱ्या १४ मार्च रोजी दुपारी बारा वाजता स्वामी समर्थ मंगल कार्यालय धारूर रोड या ठिकाणी मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील यांची संवाद बैठक होणार आहे त्यानिमित्त केज तालुक्यातील गावागावातून वाडी वस्ती तांडा तसेच केज शहरातील सकल मराठा समाजाच्या वतीने केज येथील शासकीय विश्रामगृहावर बैठक आयोजित करण्यात आली होती या या बैठकीस बहुसंख्य मराठा समाजासह बहुजन समाज मुस्लिम समाज मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते महिलाची उपस्थिती ही मोठ्या प्रमाणावर होती

गोरगरीब मराठ्यांच्या आयुष्यात नवप्रकाश आणणारा मराठ्यांचा क्रांतिसूर्य मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील यांनी समाजाच्या हितासाठी उभारलेला ऐतिहासिक जिद्दीचा लढा यशस्वी करण्यासाठी. विस्तापित व गरीब मराठा एकजुटीमुळे पिढ्यानपिढ्या प्रलंबित असलेला प्रश्न मार्गी लावण्यासाठी. सध्या महाराष्ट्रभर ७ ते मार्च १४ मार्च पर्यंत जरांगे पाटील यांची संवाद यात्रा चे आयोजन चालू आहे त्यानिमित्त त्यांनी केज या ठिकाणी मार्च १४ रोजी येणार आहेत

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी आंदोलन करणाऱ्या आंदोलकांच्या आंदोलनाला यश जोपर्यंत येत नाही तोपर्यंत मनोज जरांगे पाटील यांचे आंदोलन चालूच राहणार आहे त्यासाठी ते महाराष्ट्रभर सध्या ठीक ठिकाणी संवाद बैठक घेऊन समाजात जनजागृती



करण्याचं काम चालू आहे. मराठा आरक्षणासंदर्भातील आंदोलक मनोज जरांगे यांच्या सर्व मागण्या सरकारने मान्य केल्या नाहीत त्याबाबतचा अध्यादेशही काढण्यात आला नाही मराठा आरक्षणासाठी बलीदान दिलेल्या सर्व विर समाज बांधवांना विनम्र अभिवादन करण्यात आले आणि मराठा समाज मनोज जरांगे पाटिल यांचा सदैव ऋणी राहील दि.१४ मार्च रोजी धारूर रोड या ठिकाणी एक एकर जागेमध्ये शिवसृष्टी चे निर्माण करण्याचे सकल मराठा समाजाच्या बैठकीत ठरले आहे व त्याचे भूमिपूजन मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या हस्ते करण्यात येणार आहे तसेच केज येथील पंचायत समितीच्या बाजूला एक मदत कक्ष कुणबी प्रमाणपत्राच्या संदर्भात स्थापन करण्याचा ठराव घेणयात आला आहे व त्या ठिकाणी २० वकिलांची फौज तयार करण्यात आली आहे ती त्यांच्या वेळेनुसार प्रत्येक जण तीन तास चार तास असे टप्पे पाडून काम करणार आहेत सर्व मराठा समाजाच्या कुणबी प्रमाणपत्राच्या बाबतीत ज्या अडीअडचणी असतील त्या सोडवण्याचं काम ही वकिलाची टीमने प्रामाणिकपणे करणार असल्याचे बोलून दाखविले

## सेंद्रिय शेती काळाची गरज-शिवप्रसाद येळकर

### पैठण येथे शेतकरी गट प्रशिक्षण

**वादळवार्ता/केज**
कृषि तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) बीड,परंपरागत कृषि विकास योजना अंतर्गत शेतकरी गटाचे प्रशिक्षण पैठण येथे घेण्यात आले. प्रकल्प संचालक सुभाष साळवे यांच्या मार्गदर्शनाखाली,केज तालुका कृषि अधिकारी सागर पठाडे यांच्या नियोजनातून शेतकरी प्रशिक्षण झाले. प्रशिक्षक शिवप्रसाद येळकर,पर्यावरण मित्र डॉ हनुमंत सौदागर, तंत्र सहाय्यक सेंद्रिय शेती ऋषिकेश लोखंडे, कृषि सहाय्यक दत्तात्रय जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती.




पुढे बोलताना येळकर म्हणाले आजच्या काळात शेतीचा खर्च वाढला आहे. उत्पादन घटत आहे. सेंद्रिय शेतीच्या माध्यमातून खर्च कमी करता येईल. विषमुक्त उत्पादन तयार करणे चांगल्या आरोग्यासाठी आवश्यक आहे. शेतीतील निविष्ठा योग्य प्रकारे वापरून उत्पादन वाढवता येईल असे मत व्यक्त केले.सेंद्रिय निविष्टा तयार करणे,सेंद्रिय प्रामानिकरण करण्यासाठी आवश्यक बाबी, सेंद्रिय पिकाचे विक्री व्यवस्थापन येणाऱ्या संभावी अडचणी,उत्पादन कमी न होता शाश्वत येण्याकरिता राबविण्यात येणाऱ्या बाबी याविषयी मार्गदर्शन केले प्रशिक्षण यशस्वीतेसाठी कृषि आत्माचे योगेश पाटील यांनी परिश्रम घेतले. प्रशिक्षणास विविध गावातील सावळेश्वर, आनंद गाव, पाथरा, कानंडी बदन गटातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## केज तालुक्यातील शेतकरी सत्यमेव जयते फार्मर कप प्रशिक्षणासाठी रवाना

वादळवार्ता/केज
पाणी फाउंडेशन आयोजित सत्यमेव जयते फार्मर कप प्रशिक्षणासाठी केज तालुक्यातील शेतकरी शनिवार रोजी तीन दिवशीय प्रशिक्षणासाठी बीड तालुक्यातील आर्वी येथे रवाना झाले.

तहसीलदार अभिजित जगताप, पर्यावरण मित्र डॉ हनुमंत सौदागर, पत्रकार विजय आरकडे आदींना



प्रशिक्षणार्थींचे स्वागत करून हिरवा झेंडा दाखवून शुभेच्छा देऊन रवाना केले.

यावेळी तहसीलदार अभिजित जगताप म्हणाले प्रशिक्षण घेऊन आपली शेती समृद्ध करण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत. प्रशासन सदैव आपल्या सोबत आहे असे मत त्यांनी व्यक्त केले. डॉ हनुमंत सौदागर म्हणाले, प्रयोगशील शेतीसाठी महिला पुढाकार घेत आहेत. शेतीमाती समृद्ध करण्यासाठी प्रशिक्षण आवश्यक आहे असे मत व्यक्त केले.

प्रशिक्षणार्थी नियोजनासाठी तालुका समन्वयक हरिश्चंद्र पांचाळ यांनी प्रयत्न केले .

## श्री सिद्धेश्वर महाविद्यालयात महिला दिनानिमित्त ग्रामीण स्त्रियांच्या समस्या व उपाय या विषयावर चर्चासत्र संपन्न.

**दैनिक वादळ वार्ता**
श्री सिद्धेश्वर महाविद्यालयाच्या अंतर्गत तक्रार निवारण समितीच्या वतीने प्राचार्य डॉ. सुहास मोराळे यांच्या मार्गदर्शनाखाली व उपप्राचार्य डॉ. गजानन होन्ना व डॉ. युवराज मुळये यांच्या प्रयत्नातून जागतिक महिला दिनानिमित्त ग्रामीण स्त्रियांच्या समस्या व उपाय या विषयावर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले.

यावेळी प्रास्ताविक करताना वनस्पती शास्त्र विभागप्रमुख डॉ. प्रेमानंदा घडसिंग यांनी त्यांच्या ओघवत्या वाणीतून विद्यार्थिनींना मंत्रमुग्ध करत ग्रामीण भागातील स्त्रियांच्या विविध समस्यांवर प्रकाश टाकला. तसेच विद्यार्थिनींना चर्चेत सहभागी होण्यास प्रोत्साहित केले.



याप्रसंगी कु.दिव्या चोरमले हिने महिलादिन साजरा करण्यामागचा हेतु स्पष्ट केला तर कु . नम्रता दळवी आणि कु . मधुरा इंगोले यांनी महिला दिनानिमित्त सर्वांना शुभेच्छा दिल्या .

अध्यक्षीय समारोपात डॉ. स्वाती कुलकर्णी यांनी महिलांनी आत्मविश्वासाने जगात वावरावे, आपली प्रगती आपल्याच हातात असल्याचे प्रतिपादन केले. या कार्यक्रमात प्रा. प्रतिभा जाधव यांनी बहारदार पद्य सादर केले. तर प्रा. साखरे, ,प्रा. मस्के यांनी उस्फुर्त सहभाग नोदवत समाजातील कुप्रवृत्ती पासून आपण सावध राहून आपण आपली प्रगती केली पाहिजे असे आवाहन केले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बी. एस्सी तृतीय वर्षाची विद्यार्थिनी कु. वैष्णवी रत्नपारखी हिने केले तर आभार बी. एस्सी तृतीय वर्षाची विद्यार्थिनी कु. सायली कुलकर्णी हिने मानले.परंतु अखिल भारतीय मराठी साहित्य परिषद महाड शाखा यांचा हा घरच्या सन्मांनानं आपण भारावून गेलो असुन हा सन्मान मला पुढील साहित्यिक वाटचालीस बळ देणारा आहे असे मत श्री. तानाजी धरणे यांनी व्यक्त केले तसेच लवकरच हेलपाटा कादंबरीची दुसरी आवृती येणार असुन “ हेलपाटा “ कादंबरीची इंग्रजी आवृती लवकरच येणार असल्यानं विशेष आनंद होत असल्याचं मत श्री . धरणे यांनी व्यक्त केले . आपण सर्वांनी आपुलकीच्या नात्यानं माझ्या घरी येवून हेलपाटा चा व माझा सपत्निक सत्कार केला त्याबद्दल आदर्णिय मा. अध्यक्ष श्री. सुरेशभाई मेहता सर , मा .सौ. रिचा गांधी मॅडम, मा.सौ. संगिता कांबळे मॅडम , मा. सौ. निलांबरी घोलप मॅडम यांचे मन:पूर्वक आभार मानले .

# जनसेवेच्या माध्यमातून सामाजिक बांधिलकी जोपासावी - आमदार नमितताई मुंदडा

### मोफत शिबीरात २५० जणांची नेत्र तपासणी व २४ रूग्णांवर शस्त्रक्रिया

**दैनिक वादळ वार्ता**
**अंबाजोगाई/परवेज पटेल**
शहरातील मंगळवार पेठ भागात आयोजित मोफत शिबीरात २५० रूग्णांची नेत्र तपासणी करण्यात आली. तसेच २४ रूग्णांवर उदयगिरी लॉयन्स नेत्र रूग्णालय, उदगीर येथे योग्य ते औषधोपचार आणि शस्त्रक्रिया करण्यात आल्या आहेत. यावेळी बोलताना केज विधानसभा मतदारसंघाच्या लोकप्रिय आमदार नमिताताई अक्षय मुंदडा यांनी जनसेवेच्या माध्यमातून सामाजिक बांधिलकी जोपासावी असे आवाहन केले आमदार नमिताताई मुंदडा यांच्या वाढिवसानिमित्त युवक कार्यकर्ते अक्षय भुमकर यांच्या पुढाकाराने आणि उदयगिरी लॉयन्स नेत्र रूग्णलय, उदगीर यांच्या संयुक्त विद्यमाने शहरातील मंगळवार पेठ भागात मोफत नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. प्रारंभी आमदार नमिताताई मुंदडा यांच्या शुभहस्ते व मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. नेत्रतपासणी शिबीरात डॉ.प्रज्ज्वल देशपांडे, डॉ.प्रतीक जाधव, टेक्निशियन अविनाश आघोर यांनी रूग्ण तपासणी केली. या शिबिराचा लाभ २५० नागरिकांनी घेतला. पैकी २४ रूग्णांवर उदयगिरी लॉयन्स नेत्र रूग्णालय, उदगीर येथे योग्य ते औषधोपचार आणि शस्त्रक्रिया करण्यात आल्या आहेत. शिबिराचे उद्घाटन आमदार नमिताताई अक्षय मुंदडा यांनी केले. यावेळी बोलताना आ.मुंदडा यांनी या उपक्रमाचे कौतुक केले. अक्षय भुमकर यांनी पहिल्यांदाच एवढा मोठा दर्जेदार व लोकांना उपयोगी ठरेल असा कार्यक्रम आयोजित केला त्याबद्दल भुमकर यांचे त्यांनी अभिनंदन केले. दिवंगत लोकनेत्या डॉ.सौ. विमलताई मुंदडा यांचा समाजसेवेचा वारसा आपण सर्वांच्या सहकार्य व मदतीने पुढे नेत आहोत. महायुती सरकारच्या माध्यमातून समाजातील शेवटच्या माणसापर्यंत विकासाची गंगा आपणांस पोहोचवायची आहे भाजपाच्या राष्ट्रीय सचिव पंकजाताई मुंडे, खासदार डॉ.प्रितमताई मुंडे यांच्या नेतृत्वात तसेच ज्येष्ठ नेते नंदकिशोर मुंदडा यांच्या मार्गदर्शनाखाली आणि युवा नेते अक्षय मुंदडा यांच्या सहकार्याने अंबाजोगाई शहरासह केज विधानसभा मतदारसंघाचा सर्वांगिण विकास करण्यासाठी प्रामाणिकपणे




प्रयत्न करीत आहोत. कोट्यावधी रूपयांचा निधी मंजूर करून आणला आहे. असंख्य विकास कामे यातून मार्गी लागत आहेत. पूर्ण होत आहेत. अशावेळी अक्षय भुमकर यांच्या सारखे तरूण भाजपाच्या माध्यमातून लोकांना आवश्यक असलेले समाजोपयोगी उपक्रम राबवित आहेत याबद्दल आमदार नमिताताई मुंदडा यांनी समाधान व्यक्त केले. तर प्रास्ताविक करताना अक्षय भूमकर यांनी सांगितले की, यापूर्वी ही आपण मित्र मंडळाच्या माध्यमातून रक्तदान शिबीराचे आयोजन, ब्लँकेट वाटप, स्वाराती रूग्णालयात रूग्ण व नातेवाईकांना मदत करणे, गोर-गरीब कुटूंबांना स्वस्त धान्य मिळवून देणे, तहसील आणि नगरपरिषद कार्यालय येथे सर्वसामान्य नागरिकांची कामे करून देणे, प्रभागातील नागरी समस्या सोडविण्यासाठी पुढाकार घेणे, रस्ते, नाली, वीज पुरवठा यासाठी पाठपुरावा करणे कोविड काळात रेशनकार्ड नसलेल्या कुटुंबांना धान्य व मदत मिळवून देणे, मनोरूग्ण, बेघर लोकांना मदत करणे, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रश्नांची सोडवणूक करणे, प्रसंगी आंदोलने करणे, सार्वजनिक प्रश्नांवर निवेदने देणे, नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न करणे, आरोग्य विषयक बाबींची सोडवणूक करण्यासाठी पाठपुरावा करणे, गो-हत्येच्या विरूद्ध सातत्याने आवज उठविणे, नागरिकांसाठीच्या योजना त्यांना मिळवून देणे, नवमतदार नोंदणी उपक्रम राबविणे, शहराच्या सार्वजनिक, पर्यटन व सांस्कृतिक बाबींकरीता पाठपुरावा करणे, अंबाजोगाई शहराचा सांस्कृतिक वारसा, जोपासण्यासाठी हिरीरीने सहभाग घेणे आदी लोकहिताची कामे केली आहेत. यापुढे ही आमदार नमिताताई मुंदडा, ज्येष्ठ नेते काकाजी व युवा नेते अक्षय मुंदडा यांच्या नेतृत्वात कायम समाजसेवा करणार आहोत असे भुमकर यांनी सांगितले. तर यावेळी माजी नगराध्यक्ष महादु मस्के, माजी उपनगराध्यक्ष शेख रहीम भाई, भाजपा केज विधानसभा प्रमुख ॲड.शरद इंगळे, माजी जिल्हा परिषद सदस्य पंडित अण्णा जोगदंड, माजी उपनगाध्यक्ष सारंग पुजारी, माजी नगसेवक संजय गंभीरे, माजी नगरसेवक वाजेद खतीब, माजी नगसेवक प्रशांत आदनाक, गणेश देशमुख, उपसरपंच सुनील भाऊ मस्के, नांदे सर, बळीराम चोपणे, अनंत अरसुडे, शिरीष मुकडे, अमोल पवार, गोपाळ मस्के, गौरव लामतुरे, महेश अंबाड, मयुर रणखांब, राहुल कापसे,अमोल साखरे, सरपंच गणेश रूद्राक्ष, अजय राठोड, विष्णु जाधव, माऊली वैद्य, चंद्रकांत गुमटे, रमण सोनवळकर, गोविंद पिंपळे, गोविंद तापडिया, राजपाल सारडा, शाम सोमाणी, गौरव कामळे, श्रीनिवास पिंपळे, उमेश डोंगे, शैलेश स्वामी, अमोल विडेकर, अभिमन्यू वैष्णव, ॲड.अरविंद मोटेगावकर, पत्रकार अतुल जाधव, अतुल कसबे, स्वप्निल पंचभाई, ईश्वर कल्याणी, पप्पू आगळे, महेश तपके, जयपाल ठाकुर, विशाल भांगे, अर्शद सय्यद यांच्यासह स्थानिक नागरिक, महिला भगिणी व सहकारी व मित्रपरिवार उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन गणेश मामा काळे यांनी केले. तर उपस्थितांचे आभार रमण सोनवळकर यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी भारतीय जनता पक्ष आणि अक्षय भुमकर मित्र मंडळाच्या वतीने पुढाकार घेण्यात आला

दैनिक वादळ वार्ता हे पत्र मुद्रक ग्राफिक्स डी. टी. पी.डिजाईनर अंगद दराडे मो.8668682620 घळाटवाडी माजलगाव बीड 431131 जय श्री राम प्रेस येथून डिजिटल छापून संपादक तथा मालक वितरक अजय भांगे मो. 94226 60077 केज येथून त्यांच्या ऑफिस वरुन बीड तसेच सर्वत्र महाराष्ट्र भर डिजिटल स्वरूपात प्रकाशित केले आहे ( वाद केज / बीड न्यायालय अंतर्गत )